सं.फौ.ख.क्र.६५०/२०१९

सरकार विरुद्ध महेश

**नि.क्र. १६**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**नाव** – आफताब अहमद खान

**वय** – ४१ वर्षे व्यवसाय – खाजगी नौकरी,

**राहणार** – पार्वती नगर, नागपूर ता. व जि. नागपूर.

**<u>सरकारतर्फे सरतपास श्रीमती व्ही.ए.फुले सहाय्यक अभियोक्ता यांचे मार्फत</u>–.**

कथीत घटना दिनांक ०४.०२.२०१८ मध्ये दुपारी ०३.०० वाजता नागपूर ते उमरेड मार्गावर चांपा गावातील बसस्टँडजवळ घडली होती. त्यावेळी मी नागपूर वरुन उमरेड येथे मोटरसायकल क्र.एम.एच.३१–एफ.एच.–१७७७ ने मार्केटींग कामासाठी जात होतो. मी चांपा गावामध्ये प्रवेश केला असता पाठीमागुन एक मोटरसायकल ज्यावर पाठीमागे मोठे पोते ठेवलेले होते. सदर मोटर सायकल वेगात होती व तीने माझ्या हँडलला धडक दिली. त्यामुळे मी खाली पडलो. त्यामध्ये माझ्या छातीला, उजव्या खांद्याला, हाता पायाला मार लागला होता. माझ्या खांद्यातील हाड मोडले होते. सदर अपघातात माझ्या आयफोनचे पूर्णपणे नुकसान झाले होते. त्यानंतर मोटरसायकलवरील व्यक्ती तेथुन पळुन गेला. त्यानंतर मी उमरेड येथील माझा भाऊ सोनु खान यास फोन केला. त्यानुसार माझा भाऊ तेथे आला व त्याने मला गाडीत बसुन चौधरी हॉस्पीटल, सक्करदरा नागपूर येथे नेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी चांडक हॉस्पीटल येथे जाऊन उपचार घेतला. तेथे मी १५ दिवस दाखल होतो. त्यानंतर एलएक्सीस हॉस्पीटलमध्ये उपचार घेतला. त्यानंतर मी पोलीस चौकी, पाचगाव येथे अपघाताबाबत रिपोर्ट दिला होता. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांनी माझे बयान घेतले होते. रिपोर्ट देतांना मी पोलीसांना माझ्या मोटरसायकलचे दस्ताऐवज व अपघातातील दुसऱ्या मोटरसायकलचा फोटो

दिला होता. अपघातातील धडक दिलेल्या मोटरसायकलचा क्र.एम.एच.३१–ईआर.७८२० असा होता. त्या मोटरसाकल चालकाला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी तो न्यायालयात आरोपीच्या जागेवर बसलेला आहे.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास वकील श्री. जी. पी. मेश्राम यांचे मार्फत सुरु</u>.**

२. घटनेच्या वेळी माझ्या मोटरसाकलचा वेग हा प्रति तास ४७ ते ५० होता. हे म्हणणे खरे नाही की, मी वेगाने जात होतो व अचानक थांबल्यामुळे पाठीमागुन आरोपीच्या गाडीची धडक झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी रिपोर्ट दाखल केली आहे.

**(साक्षीदाराने त्याची साक्ष हिंदीमध्ये दिली असुन त्याचा मी मराठीत अनुवाद करुन साक्ष नोंदवीली आहे. साक्षीदारास त्याची साक्ष हिंदीमध्ये समजावून सांगितली असता त्याने बरोबर असल्याचे मान्य केले.)**

**उलटतपास संपला.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक २८.११.२०२५

(पी.के.मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कुही, जि. नागपूर.